## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ४९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/०१/२०१७

**१) संगनमत करुन बिना परवाना रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २०/०१/२०१७ चे १०.३० वा. दर. यातील फिर्यादी तहसीलदार सुखदेव खुशालराव वासनीक वय ५४ वर्ष, तहसीलदार कार्यालय पवनी हे अवैध रेतीची वाहतुक करणारे वाहनाची तपासणी नाका पवनी येथे करीत असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या मालकांशी संगनमत करुन आपल्या ताब्यातील ट्रकमध्ये ९ ब्रास रेती चोरीने भरुन वाहतुक करीत असतांनी मिळुन आल्याने त्याचेकडे रॉयल्टी बाबत विचारणा केली असता त्याने ७ ब्रास रेतीची रॉयल्टी सादर केली व त्याचे वाहनात २ ब्रास रेती कि. ४,०००/–रु. ची अतिरिक्त मिळुन आल्याने फिर्यादीचे लेखी पत्रावरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणावरुन हातोडीने कपाळावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २०/०१/२०१७ चे १०.३० वा. दर. यातील आरोपी हा फिर्यादी सचीन हरीदास विरुटकर वय २१ वर्ष, रा. पाचगाव यांचे वडीलाकडे वांरवार पाहुण खेकसावुन/चिडुन धावत होता. त्यावर फिर्यादीची आई शंकुतला हरीदास विरुटंकर ही मध्यस्ती बोलली असता आरोपी हा फिर्यादीचे आई वडीलास मारण्यासाठी धावला असता भांडण सोडविण्या करीता फिर्यादी आला असतांनी आरोपीने आपल्या हातातील लहान हातोडीने फिर्यादीचे कपाळावर मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. खोकले पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक २०/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ९७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०१ तीन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

PSI
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.